IJFANS INTERNATIONAL JOURNAL OF FOOD AND NUTRITIONAL SCIENCES
ISSN PRINT 2319 1775 Online 2320 7876
*Research Paper* **© 2012 IJFANS. All Rights Reserved**, UGC CARE Listed ( Group -I) Journal Volume 12, Iss 01, 2023

# डॉ.मधुकर वाकोडे :- व्यक्ती आणि वाङमय

संशोधक विद्यार्थीनी : विजया विनायकराव वानखेडे
स्नातकोत्तर मराठी विभाग रा.तु.म.नागपूर विद्यापीठ, नागपूर.
मार्गदर्शक : प्रा. डॉ. राकेश देवरावजी कभे.
मराठी विभागप्रमुख, महात्मा गांधी कला -वाणिज्य महाविद्यालय, पारशिवनी, जि. नागपूर.

**गोषवारा :-** डॉ. मधुकर वाकोडे यांची साहित्य क्षेत्रात लोकसाहित्याचे संशोधक म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळख आहे. लोकसंस्कृतीला वेगवेगळया रूपात दर्शविताना, वैशिष्ट्यपूर्ण शैलीतील व्यक्तिरेखा त्यांनी आपल्या कादंबऱ्यांतून व्यक्त केल्या आहे. त्यांनी आदिवासी व झिंगा भोई समाजावर लिहिलेल्या अनुक्रमे झेलझपाट व सिलीपशेरा या कादंबऱ्यांनी प्रादेशिक मराठी वाङमयाला समृद्ध केले आहे. त्यांच्या विद्वत्तेमुळे व निगर्वी स्वभावामुळे ते अजातशत्रू ठरतात. ते ज्या सामाजिक, सांस्कृतिक, परिस्थितीत जन्माला आले, त्या परिस्थितीच्या शोधातून त्यांचे संशोधन पर साहित्य उदयाला आले. त्यांच्या दीर्घकालीन सखोल अभ्यास व मुलगामी वैचारिक पातळीच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या संशोधन लेखनाची चिंतनगर्भदृष्टी, सर्वांगीण चिकित्सक वृत्ती ही त्यांच्या वाङमयाची प्रमुख वैशिष्ट्ये दिसून येतात. त्यांच्या साहित्य निर्मितीचा प्रारंभ आणि प्रेरणा त्यांच्या "बहिष्कार" या अप्रकाशित कादंबरी पासूनच झाली. अगदी लहान वयात, म्हणजे दहाव्या वर्गात असताना गावात आलेल्या महापुराने गावातील व्यवस्था मोडकळीस आली. गावातील शांत वातावरणात खळबळ निर्माण झाली, आणि या घटनेच्या तीव्र संवेदना लेखकांना जाणवू लागल्या. लोकसंस्कृतीच्या अवलोकना बरोबरच निसर्ग व लोकतत्त्विय जीवनानुभव, काव्य करणारा कवी, देशी जाणीवेच्या कादंबऱ्या लिहिणारा कादंबरीकार ठरला.

**सूचनक शब्द** :- लोकसंस्कृती, पार्श्वभूमी, आजातशत्रू, औचित्य, प्रांत, व्यक्तिमत्व, अविष्कार, सर्जनशीलता, एकात्मता, व्यासंग, दमछाक, ग्रामीणत्व, सांक्षेपी, मिथक.

**विषय विवेचन** :- डॉ. मधुकर वाकोडे यांची ख्याती लोकसंस्कृतीचे सांक्षेपी संशोधक व लोकसाहित्याचे संपादक म्हणून केली जाते. त्यांनी लोकसंस्कृतीच्या सिंहावलोकनातून मेळघाटातील कोरकू, आदिवासी आणि झिंगाभोई या भटक्या जमातीच्या पार्श्वभूमीवर "झेलझपाट व सिलीपशेरा" या दोन कादंबऱ्यांचे लेखन करून, एकूणच प्रादेशिक मराठी वाङमयाला समृद्ध करण्याचे मोलाचे कार्य केले आहे. लोकसाहित्याचे संपादक म्हणून त्यांना मान आहे. एक विद्वान व्यक्तिमत्व असूनही, अतिशय निगर्वी, मधुर बोलणे, बोलण्यात विद्वत्तेची झाक इ. गुणांमुळे ते अजातशत्रू ठरले. त्यांच्या हसमुख चेहऱ्यामुळे पोरांपासून थोरांपर्यंत त्यांचा आदर होता. ज्या सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणात त्यांचा जन्म झाला, ते वाढले, त्या जीवनाचे वर्णन त्यांनी अत्यंत लालित्यपूर्ण शब्दांमध्ये आपल्या ललित साहित्यातून केले आहे. समाजातील चालीरीती, त्यातील बारकावे शोधणे, यावरूनच त्यांच्या निरीक्षण शक्तीचा व प्रतिभेचा प्रत्यय येतो.

डॉ. मधुकर वाकोडे यांच्या लेखन कार्याला अगदी लहान वयापासूनच सुरुवात झाली. शैक्षणिक वर्षाच्या दहाव्या वर्गात असतानाच, गावात महापूर आला आणि गावातील शांत वातावरणात खळबळ माजली. गावातील लोकांचे जीवनमान अस्ताव्यस्त झाले, त्या अवलोकनातूनच १९६०साली त्यांनी "बहिष्कार" ही कादंबरी लिहिली. त्यांच्या काव्य लेखनास व लोकसाहित्याचे संकलन, संपादन आणि अध्ययनास नेमकेपणाने सुरुवात झाली. त्यांचवेळी त्यांची 'बुलाखराव बापू' ही व्यक्तीचित्रणात्मक कथेचा समावेश बारावीच्या पाठ्यपुस्तकात करण्यात आला. उज्जैन विक्रम विश्वविद्यालयाची आचार्य पदवी प्राप्त केल्यानंतर, सातपुडा पर्वताच्या कडेकपारीत राहणाऱ्या कोरकू, भिल्ल, आदिम जमातीच्या जीवन धारणेचा, त्यांच्या बोलीचा, सखोल अभ्यास केला. त्यांच्या या सखोल वैचारिक पातळीच्या पार्श्वभूमीवर सर्वांगीण चिकित्सकवृत्ती, चिंतनगर्भदृष्टी, ही त्यांच्या लेखनाची महत्त्वाची वैशिष्ट्ये ठरली.

संशोधन समीक्षेपुरताच डॉ.वाकोडे यांचा प्रांत नसून, मौलिक असे ललित साहित्य निर्मिती करून, मराठी साहित्याला त्यांनी समृद्ध केले, याचे उदाहरण त्यांची झेलझपाट ही कादंबरी होय. मराठीतील ग्रामीण प्रादेशिकतेत

 © 2012 IJFANS. All Rights Reserved, 

किंवा साहित्य प्रवाहात त्यांची कादंबरी 'मैलाचा दगड' ठरावी. या कादंबरीला पुण्याच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेचा कै. ह.ना.आपटे पुरस्कार प्राप्त झाला. १९८०- ९० च्या दशकात तिला उत्कृष्ट कादंबरी म्हणून संबोधण्यात आले. याचाच परिणाम ही कादंबरी नागपूर विद्यापीठाच्या एम. ए. मराठी च्या अभ्यासक्रमात समाविष्ट करण्यात आली. या कादंबरीच्या माध्यमातून एक अस्पर्शीत व दुर्लक्षित जीवन विश्व सहृदयतेने जवळ आले.

कोणत्याही लेखक साहित्यिकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आढावा घेण्यासाठी त्याची संकल्पना आधी समजून घ्यावी लागते. कारण लेखक, कवींचे जीवन हे जटिल, गुंतागुंतीचे, व्यामिश्र स्वरूपाचे असते. या संदर्भात डॉ. रा. भा. पाटणकर म्हणतात, "एखाद्याचे व्यक्तित्व कळायला हवे असेल तर, तो कोणत्या वर्गात जन्मला व वाढला एवढेच कळून भागणार नाही, तर त्याच्या भोवतालच्या सर्व परिस्थितीची माहिती करून घेणे ही आवश्यक असते. त्याचबरोबर त्या व्यक्तीने केलेली जीवनमार्गाची निवड ही लक्षात घेणे गरजेचे ठरते, ही निवड अनेक नियमांचा परिपाक असते. तिच्या मागे अनेक कारणे असू शकतात. जसे, (cause, reasons)."[१] म्हणजेच मानवी व्यक्तिमत्व रचनेत बाह्य परिवेशातील घटने बरोबर सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक वातावरण, आनुवंशिकता, सहज प्रेरणा, दृश्य शरीर रचना, कला-विद्या व्यासंग, अभिरुची, पूर्वानुभव इ. घटकांचा सहभाग असतो.

लोकसंस्कृती ही डॉ. मधुकर वाकोडे यांच्या प्रतिभा अविष्काराची केंद्रके आहेत. जनजीवनातील अनुभव, तत्वज्ञान, ललितकला, संस्कृती व मानव वंश शास्त्र या सर्व शाखांचा आधार घेत, मौलिक संशोधनातून मराठी समीक्षेला समृद्ध करण्याचे कार्य त्यांनी केले, म्हणूनच समीक्षकांनी डॉ. वाकोडे यांना "लोकसाहित्याचे विचक्षण समीक्षक म्हटले आहे".[२] अनेक गुंतागुंतीच्या, घटना प्रसंगांच्या जीवन प्रवासातून, विविध पातळ्यांवरील संघर्ष, संदर्भ आणि वाङमयीन वैचारिक क्षमता यांच्या संमिश्रनाने त्यांचा जीवन प्रवास समृद्ध झाला. अनुकूल- प्रतिकूल अशा विविध घटनांनी त्यांचा जीवनप्रवास यशस्वी ठरला.

## डॉ.मधुकर वाकोडे यांचे बालपण, शिक्षण व जडणघडण :-

आकोट तालुक्यातील पळसोद या गावी ०१ जानेवारी १९४३ रोजी एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. प्राथमिक चौथ्या वर्गापर्यंतचे शिक्षण पळसोद येथील प्राथमिक शाळेत झाले. इयत्ता पाचवी ते अकरावी पर्यंतचे उच्च माध्यमिक शिक्षण आकोट येथील, अमरावतीच्या शिवाजी शिक्षण संस्था संचालित शिवाजी हायस्कूलमध्ये झाले. याच काळात डॉ.वाकोडे यांना भाषा, साहित्य आणि संस्कृती विषयक आवड निर्माण होत गेली. त्यांची आवड, छंद प्रगल्भ करण्यासाठी, जोपासण्यासाठी, शाळेतील शिक्षक व ग्रंथालयातील पुस्तके यांचा फार मोठा आधार मिळाला. सातपुड्याच्या पायथ्याशी त्यांचे आजोळ असल्यामुळे, निसर्गाच्या सानिध्यात, पहाड कपारीत मनसोक्त भटकंती झाली. तेथील निसर्गाशी त्यांची जवळीक, ओढ, निर्माण झाली. त्यामुळे सुट्टीचा मुक्काम त्यांना आजोळाकडेच ओढवत असे. पहाडाच्या कड्या कपारीत वास्तव्यास असणा असणाऱ्या आदिवासी कोरकू समाजातील लोकांच्या हालचालींवर, बोलीभाषेवर त्यांचा विशेष कटाक्ष असे.

डॉ. वाकोडे यांच्या व्यक्तित्वात महत्त्वाचा आणि मोठा भाग म्हणजे त्यांचे लोकसाहित्या वरील लालित्यपूर्ण लेखन होय. त्या काळातील लेखक फडके, खांडेकर, अण्णाभाऊ साठे, ग.ल.ठोकळ यांच्या साहित्याचे वाचन करून, त्यातून प्रेरणा घेत घेत अर्नाळकरांच्या 'डिटेक्टिव्ह' कादंबऱ्यांचे वाचनातून कादंबरी वाचन हा त्यांचा विरंगुळा झाला. त्यांचे लोकसाहित्यावरील लेखन व संशोधन एक प्रेरणा ठरली. विदर्भातील एक अभ्यासक डॉ. दा.गो.बोरसे यांचे डॉ. वाकोडे यांनी लहानपणी लोकसाहित्यावरील भाषण ऐकून ते प्रभावित झाले. लोकप्रतिभा आणि लोकतत्त्वे या पुस्तकाच्या निमित्ताने ज्ञानेश्वर. म. कुलकर्णी म्हणतात, "लोकसाहित्य आणि लोकसंस्कृतीवर अभ्यास करणाऱ्याच्या मनामध्ये या साहित्याविषयी नितांत आदर आणि प्रेम असणे आवश्यक असते. जिज्ञासा आणि निरहंकारी मनाने ध्यास घेऊन एक व्रत म्हणून हे कार्य पार पाडावे लागते."[३]

आकोट येथील डॉ. भाऊसाहेब देशमुख यांच्या प्रयत्नाने गांधीग्रामात नवीन महाविद्यालय सुरू झाले. या महाविद्यालयात डॉ.वाकोडे यांनी अकराव्या वर्गात आपल्या सहाध्यायांसह प्रवेश घेतला. तेथे नव्याने रुजू झालेले प्राचार्य गु. मा. सोमवंशी यांनी वाकोडे यांचे वक्तृत्व पाहून प्रभावित झाले. प्राचार्यांचे आवडते विद्यार्थी तसेच "विद्या" या वार्षिक अंकाचे संपादक पदही त्यांना मिळाले. शैक्षणिक प्रवासात बी.ए.प्रथम वर्षाला असताना नागपूर येथील

दैनिक 'महाराष्ट्रच्या' दिवाळी अंकात डॉ. वाकोडे यांची 'सरिता' ही कविता प्रकाशित झाली. आपले लेखन प्रकाशित झाल्याचा जो आनंद नवोदित लेखक, कवींना होतो, तोच कमालीचा आनंद डॉ. वाकोडे यांनाही झाला. महाविद्यालयीन जीवनात प्रसिद्धीस असणाऱ्या लेखक कवींच्या वाङमयीन सहवासाने कथा, कविता, वाचन, लेखनास, अनुकूल परिस्थितीचा लाभ मिळाला. भाऊ भालेराव यांच्या प्रेरणेने छत्रपतींच्या आदर्श सामाजिक विचारांचा प्रभाव डॉ.वाकोडें वर झाला. वेगवेगळ्या मासिकातून काव्य लेखन करून त्यांचे वाङमयीन व्यक्तिमत्व महाविद्यालयीन जीवनातच आकारास येऊ लागले.

महाविद्यालयात छात्र संघाचे सचिव पद असल्यामुळे स्नेहसंमेलन सास्कृतिक, वाङमयीन उपक्रमांचे आयोजन करण्याची संधी मिळाली. कवी सुरेश भट यांच्या काव्याचा प्रभाव तसेच शालेय व महाविद्यालयीन मित्र, मराठीतील प्रसिद्ध कवी डॉ. विठ्ठल वाघ यांच्या मैत्रीपूर्ण वातावरणातच दोघांच्या वाङमयीन चर्चा, परस्परांना कविता वाचून दाखवणे, अशा मैत्रीतूनच वाङमयीन आणि संस्कृती विषयक वाटचाल समृद्ध होत गेली. पदवी प्राप्त झाल्यानंतर समोरचे शिक्षण घ्यायचे आहे, तरी घरातील प्रतिकूल आर्थिक परिस्थितीमुळे किनगाव जट्ट येथील शिवाजी हायस्कूल मध्ये शिक्षकांचा पेशा पत्करला. त्याचबरोबर दोन वर्षात एम.ए.करायचेच हा निर्धारही केला.आणि बहि:शाल विद्यार्थी म्हणून डॉ. वाकोडे दोन वर्षात एम.ए. झाले. बालमित्र कवी डॉ. विठ्ठल वाघ आणि डॉ. वाकोडे एकाच वेळी प्राध्यापक पदी रुजू झाले. डॉ. विठ्ठल वाघ अकोला येथील शिवाजी महाविद्यालयात तर डॉ. वाकोडे अंजनगाव येथील सारडा महाविद्यालयात जुलै १९६९ मध्ये मराठीचे प्राध्यापक म्हणून रुजू झाले. त्यांचे वाङमयीन प्रेम व समीक्षक वृत्तीमुळे त्यांना त्यांच्या साहित्य निर्मितीची साधना व संशोधनाचा व्यासंग करता आला. अंजनगाव हीच त्यांची निर्मिती भूमी ठरली.

सन १९७० मध्ये डॉ.मधुकर वाकोडे यांचा विवाह झाला. त्यादरम्यान त्यांनी उज्जैन येथील डॉ.शशिकांत सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी.चे संशोधन कार्य सुरू केले. त्यांच्या पीएच.डी.संशोधनाच्या कठीण काळात त्यांच्या सौभाग्यवती सौ. मालतीताई वाकोडे यांनी त्यांच्या संशोधन कार्यास मदत केली.स्वतः काटकसरीने प्रपंच सांभाळून त्यांना अध्ययनास मोकळीक दिली. मालती ताईंच्या सहकार्याने संशोधन कार्य न रेंगाळता लवकर पूर्णत्वास आले, आणि १९७७ साली त्यांच्या 'लोकगीते -जानपद गीते: प्रेरणा, प्रक्रिया आणि प्रवाह' या प्रबंधास पीएच.डी. ही पदवी मिळाली.

एक समीक्षक, संशोधक, ललित लेखक त्याचबरोबर आपल्या अमोघ वक्तृत्वाने श्रोत्यांची मने जिंकणारे अव्यसाची वक्ते म्हणून आवडीचे ठरले. त्यांचे व्याख्यान जणू ज्ञान आणि रंजन यांची पर्वणीच ठरते. डॉ. वाकोडे यांनी आजपर्यंत कित्येक मानाची आणि महत्त्वाची पदे विभूषित केली आहेत. त्यांच्या या कार्यक्षेत्रात अमरावती विद्यापीठाच्या सर्वोच्च, दीर्घकाळ प्राधिकारीणीवर कार्य करण्याची मानाची संधी त्यांना उपलब्ध झाली. मराठी अभ्यास मंडळाच्या अध्यक्षापासून तर विद्वत परिषदेपर्यंत सर्वच प्राधिकारिणींवर सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले. १९९० ते १९९६ या काळात त्यांनी दोन वेळा कुलपती नामीत मानद सदस्य म्हणून काम केले, तसेच नागपूर आणि अमरावती विद्यापीठात पीएच. डी. पदवीचे मार्गदर्शक म्हणूनही त्यांना मान्यता होती. त्याचबरोबर मुंबई दूरदर्शनच्या कार्यक्रम सल्लागार मंडळावर लोककला परिषद, मुंबई कार्यकारिणी वर शासनाने त्यांची नेमणूक केली. अशी अनेक पदे त्यांनी सन्मानाने विभूषित केली.

यावरून डॉ. वाकोडे यांचे लौकिक व्यक्तीमत्व एक आदर्श ध्येयवादी गृहस्थ, प्राध्यापक, प्रभावी वक्ता, व्यासंगी संशोधक, लोकसंस्कृतीवर प्रतिभा असणारा कवी, कथाकार, कादंबरीकार, आणि विद्वान अशा अनेक पैलूत ते रुजलेले दिसून येतात.

## डॉ. वाकोडे यांच्या साहित्य निर्मितीचा प्रारंभ आणि प्रेरणा :-

डॉ.मधुकर वाकोडे यांनी दहाव्या वर्गात असताना अनुभवलेले चित्र "बहिष्कार" या कादंबरीत अगदी लहान वयातच व्यक्त केले आहे. हीच त्यांची पहिली साहित्य कृती होय. खेड्यातील शांत वातावरणात महापुरामुळे खळबळ माजली, या खळबळीमुळे त्यांच्या संवेदना तीव्र झाल्या, त्या घटनेवर आधारित 'बहिष्कार' ही कादंबरी लिहिली. त्यांच्या हस्तलिखित, अप्रकाशित स्वरूपातील कादंबरीचे प्रकाशन आकोट येथील तत्कालीन सिविल जज श्री काझी यांचे हस्ते आणि मुख्याध्यापक श्री. एन. बी.देशमुख यांच्या उपस्थितीत १४ नोव्हेंबर १९६० रोजी करण्यात आले.

आपल्या आयुष्यातील हा पहिला आनंदाचा क्षण होय, असे त्यांना वाटल्या वाचून राहिले नाही. याच काळात प्रसिद्ध कवी मधुकर केचे यांचा स्नेह, मार्गदर्शन लाभल्यामुळे त्यांच्या उमलत्या वाङमयीन निर्मिती काळात झालेल्या संस्कारामुळे डॉ. वाकोडे यांच्या पुढील प्रवासाला योग्य दिशा मिळाली.

साहित्यनिर्मितीच्या प्रेरणेसंबंधीच्या मुलाखतीत डॉ.वाकोडे म्हणतात, 'माझे गाव पळसोद हे साम्यवादी विचारांचे, नी कार्यकर्त्यांचे गाव, वडील शेकापचे कार्यकर्ते, माणसांचे विविध नमुने व माझे बालपणापासूनचे जीवन बहुढंगी आहे, कधी कोळयांच्या मुलांत, कधी कलालांच्या मुलांत, राकट, रानवट मुलात वावरल्याने माझे व्यक्तिमत्व बहुआयामी बनले.मुळात चळवळया स्वभाव असल्याने राजकीय जाणीवा होत्या, त्यातून मिळणाऱ्या प्रेरणेतूनच लिहित राहिलो." (परिशिष्ट -एक) विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या अंतर्गत १९७०ते १९८५ या १५ वर्षात अमरावती जिल्ह्यातील मेळघाट आणि दुर्गम भागात विशेष शिबिरे घेऊन टेंभूसोंडा, इरिसाल, दुनी, कुसुमकोट या मेळघाटातील आदिवासी परिसरात त्यांनी विद्यार्थ्यांना सेवा कार्यात सक्रिय केले, प्रवृत्त केले. त्यांच्या या जिवंत अनुभवातून आकाशवाणी नागपूरच्या प्रसारणासाठी श्री. बबन नाखले (कार्यक्रम अधिकारी) यांच्या मागणीवरून 'झेलझपाट 'ही कादंबरी लिहिली. ती कादंबरी रसिकांना इतकी आवडली की तिचे पुन्हा प्रसारण करण्यात आले. शालेय जीवनात लिहिलेल्या 'बहिष्कार' या हस्तलिखित कादंबरी नंतर १९६४ पासून त्यांच्या कथा, कविता, सतत प्रसिद्ध होऊ लागल्या.

१९८९ मध्ये झेलझपाट कादंबरीमुळे मराठी प्रादेशिक- ग्रामीण देशी-जाणिवेचा लेखक अशी त्यांची प्रतिमा निर्माण झाली.

डॉ.वाकोडे यांनी आपले ललित साहित्य व संशोधन पर साहित्य यांच्यात एकात्मता जोपासलेली आहे. लोकसाहित्याच्या संदर्भात संशोधन करणे व त्याचवेळी स्वतंत्र निर्मिती करणे ही दोन्ही कामे एकाच वेळी कसे होऊ शकते, याविषयी ते आपल्या मुलाखतीत म्हणतात, 'कोणताही सर्जनशील ललित लेखक नि साक्षेपी संशोधक यांना एकाच वेळी ललित लेखन आणि संशोधन करणे अडचणीचे ठरत असते. लेखनाचा ट्रॅक बदलतो, कुठलीही निर्मिती ही आनंदवर्धकच असते. ही कसरत करत असताना मनात बेचैनी असते, ही बेचैनी दोन स्तरावर वावरण्यास बाध्य करते. एका लेखनातून डोके वर काढून नवीन ललित वाङमय वाचणे, नवे शोध लावणे, गोंधळणे आणि अशा काळात सूर लागल्यावर ललित लेखन करणे, असे कार्य सुरू असतानाच दोन्ही अंगाने केलेले ललित लेखन हे छळणार असतं. दोन बायकांच्या दादल्यागत ही हैराणी असते, एक अघळ पघळ प्रेमान वागणारी, तर दुसरी नुसती शिस्त, जरब नि प्रत्येक गोष्टीचा पुरावा मागणारी, अशा दोन बायकांच्या कात्रीत सापडणाऱ्या माणसासारखी अडचण होते. त्यांच्या हट्ट करण्याच्या प्रवृत्ती वेगळया." [४] डॉ. विठ्ठल वाघ यांच्या 'काया मातीत' या कवितासंग्रहाला दिलेल्या दीर्घ प्रस्तावनेचे हे प्रतीक आहे.

## वाङमयीन व्यक्तिमत्व :-

डॉ.वाकोडे यांचे वाङमयीन व्यक्तिमत्व आणि त्यांचे लौकिक व्यक्तिमत्व यात फारशी भिन्नता दिसून येत नाही. सहजता हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे एक महत्त्वाचे लक्षण होय. अविरत वाचन, व्यासंग आणि चिंतन यामुळे त्यांच्या वैचारिक व्यक्तिमत्त्वाचा, वाङमयीन साहित्य निर्मितीवर मोठा प्रभाव आहे. साठोत्तरी मराठी लोकसाहित्यात समुह जाणीवेला, लोक माणसाला प्राधान्य दिले. डॉ.वाकोडे यांच्या साहित्यात ही समूह जाणिव प्रकर्षाने दिसून येते. समाजातील समष्टीच्या जाणिवा आणि व्यक्तिगत भावना विश्वाच्या खाणाखुणा वेगवेगळया स्वरूपात व्यक्त झाल्या आहेत. त्यांच्या साहित्यातून प्रतीत होणारी लोकसंस्कृतीची अनन्य विशेषता आणि पारदर्शकता हा त्यांच्या वाङमयीन व्यक्तिमत्त्वाचा एक विशेष होय. डॉ. वाकोडे यांचे व्यक्तिमत्व हे विशेषता एका लोकसंस्कृतीवर आधारलेले समुहनिष्ठ व्यक्तिमत्व आहे. त्यांनी आपल्या लोकनिष्ठ अनुभवांना काव्यात्मतेच्या, लालित्याच्या मुशीतून सहजपणे अविष्कृत करण्याचे वैशिष्ट्यपूर्ण सामर्थ्य त्यांच्या लेखन शैलीत आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रखर लोकनिष्ठा, संशोधन वृत्ती, व्यापक सामाजिक सहानुभूती, यांच्याशी ललित व ललितेतर साहित्याचे अभिन्न नाते जोडलेले आहे.

डॉ.मधुकर वाकोडे यांच्या साहित्याची सामाजिक बांधिलकी ही एका विशिष्ट समूहनिष्ठेशी सुसंगत अशीच आहे. साहित्यातील वेगवेगळया उपेक्षित समूहाच्या पृथक अभिव्यक्तीचे समर्थन करताना म्हणतात, "ग्रामीणतत्त्वाचे,

दलितत्त्वाचे, आदिवासी, असण्याचे भांडवल कशाला ? असा प्रश्न एका अध्यक्षीय भाषणातून आला. हा प्रश्न वाङ्मपोटी आला असला, तरी वाङ्मयीन चळवळीची मराठी भाषेच्या अभिवृद्धीसाठी आवश्यकता आहे. लोकसाहित्याचे सामर्थ्य बोलीभाषेच्या सामर्थ्यावर अवलंबून असल्यामुळे, प्रमाण भाषेचे बोलीवर अतिक्रमण करून विद्यार्थ्यांच्या भाषिक सर्जनशीलतेवर कसा अन्याय केला आहे, हे त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून सांगितले आहे. "आजचा विद्यार्थी प्रमाणभाषा, लोकभाषा आणि बोलभाषा या तीन पातळ्यांवर ग्रांथिक मराठी आत्मसात करताना तो संघर्ष करीत असतो. शालेय आणि विद्यालयीन जीवनात तो प्रमाणभाषेतून अध्ययन करतो. हीच तुझी मातृभाषा म्हणून आपण त्याचा गोड गैरसमज करून दिलेला असतो."[५]

**सारांश :-** डॉ.मधुकर वाकोडे यांची व्यक्ती आणि वाङ्मय या साहित्य प्रवासातील कार्य लक्षात घेता, लोकसंस्कृतीचे अवलोकन करणारा अभ्यासक, तसेच निसर्ग व लोकतत्त्वीय जीवनानुभव यावर लेखन करणारे कवी, लेखक, कथाकार, कादंबरीकार, तसेच त्यांच्या देशी जाणिवेच्या कादंबऱ्या लिहिणारा कादंबरीकार म्हणून तीन टप्प्यात त्यांची ओळख होते. डॉ.वाकोडे यांचे लोकनिष्ठ लोकसंस्कृतीने भारावलेले व्यक्तिमत्व सातत्याने जाणवत राहते. व्यक्तिमत्त्वाची पारदर्शकता हे त्यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या लेखन शैलीत लोकनिष्ठ अनुभव हा लालित्यपूर्ण व सहज अविष्कार करणारा आहे. यावरून डॉ. वाकोडे यांच्या ललित व ललितेतर साहित्याचे त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील प्रखर लोकनिष्ठा, संशोधन वृत्ती, व्यापक सामाजिक सहानुभूती, यांच्याशी ते निगडित आहेत.

## संदर्भ टिपा :-

१) रा.भा.पाटणकर, ' सौंदर्य मीमांसा दु.आ.पुणे १९८१ पृष्ठ १७८.

२) किशोर सानप, 'मराठी लोककथा : लोकसंस्कृतीचा वसा जपणारा ग्रंथ' दै.लोकपत्र, सौरभ साहित्य पुरवणी, दिनांक १४जाने १९९६.पृष्ठ.३.

३) ज्ञानेश्वर. म. कुलकर्णी, 'एक प्रामाणिक विचारमंथन: लोकप्रतिभा आणि लोकतत्त्वे' दै.पुढारी, कोल्हापूर. दि.२९ ऑक्टो.१९९५.पृष्ठ.२.

४) विठ्ठल वाघ, 'काया मातीत मातीत' पुणे चौथी आवृत्ती १९९४.

५) डॉ.मधुकर वाकोडे अध्यक्षीय भाषण, अमरावती विद्यापीठ, मराठी प्राध्यापक परिषद आठवे अधिवेशन, अकोला. दि.५ व ६ फेब्रु.१९९४.पृ.२.

## संदर्भ ग्रंथ :-

१) डॉ. शरयू तायवाडे : डॉ. मधुकर वाकोडे साहित्यदर्शन, सचिन उपाध्याय, विजय प्रकाशन- नागपूर, प्रथम आवृत्ती १ सप्टेंबर२०११.

२) डॉ. मधुकर वाकोडे : झेलझपाट, देशमुख आणि कंपनी, पुणे चौथी आवृत्ती, १९९७.

३) डॉ.मधुकर वाकोडे : सिलिपशेरा :देशमुख आणि कंपनी, पुणे, प्रथम आवृत्ती १९९८.

४) डॉ.मधुकर वाकोडे : 'बहिष्कार' अप्रकाशित, पहिली कादंबरी.